प्रेस नोट

## सोलापूर मनपात बुधवारी माहिती अधिकार दिन

केंद्रशासनाच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये नागरिकांना सुलभपणे माहिती मिळावी यासाठी दर महिन्याच्या दुस-या बुधवारी सोलापूर मनपातर्फे मनपाच्या इंद्रभुवन इमारतीत माहिती अधिकार दिनाचे आयोजन सकाळी ११ ते १३ दरम्यान करण्यात येते मनपाच्या इंद्रभुवन आवारातील उपलब्ध माहिती विहित शुल्क आकारुन त्वरीत देण्यात येते.माहिती अधिकार मंच सोलापूरचे पदाधिकारी व कार्यकर्ते यासंबधी नागरिकांना सहकार्य व मार्गदर्शन करतात.तरी नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपातर्फे करण्यात येत आहे.

कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर